# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, नाशिक
दिनांक ०४.११.२०२५

**लोकसेवक** १) पांडुरंग तुकाराम गोतीसे, मंडळ अधिकारी, डुबेर, २) प्रदिप लक्ष्मण तांबे, मंडळ अधिकारी वडांगळी, ३) राहुल उमेश कालबोगवार, तलाठी, आशापुरा अतिरिक्त कार्यभार ठाणगांव ४) सुनिल अशोक शिंदे, (खाजगी इसम) तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करुन तसेच लाच मागणीस प्रोत्साहान देवून लाचेची रक्कम सुनिल अशोक शिंदे, (खाजगी इसम) यांनी आज दिनांक ०४.११.२०२५ रोजी स्विकारल्याने गुन्हा

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | नाशिक |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | सिन्नर पो.ठाणे /२०२५ |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन-१९८८ चे कलम ७, ७-अ व १२ प्रमाणे दि. ०५.११.२०२५ रोजी |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | १) राहुल उमेश कालबोगवार, तलाठी, वय-३५ वर्षे, आशापुरा अतिरिक्त कार्यभार ठाणगांव<br>२) पांडुरंग तुकाराम गोतीसे, मंडळ अधिकारी, डुबेर, वय-५५ वर्षे<br>३) प्रदिप लक्ष्मण तांबे, मंडळ अधिकारी वडांगळी, वय-५४ वर्षे,<br>४) सुनिल अशोक शिंदे, वय-४३ वर्षे, (खाजगी इसम) |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | १,००,०००/- रुपये |

**थोडक्यात हकिगत :-** तक्रारदार यांनी त्यांच्या शेत जमीनीची भुमि अभिलेख विभागाकडून सन-२००६ मध्ये पोटहिस्सा मोजणी केली असुन उपअधीक्षक भुमि अभिलेख, सिन्नर यांनी मोजणी प्रमाणे क्षेत्राची ७/१२ उताऱ्यावर वेगवेगळे नोंद होणेकरीता हिस्सा फॉर्म नं.१२ तहसिलदार, सिन्नर यांचेकडे सादर केला होता. त्याप्रमाणे कार्यवाही होणेकरीता तक्रारदार हे वेळोवेळी पाठपुरावा करीत होते. तेव्हा तक्रारदार यांना त्यांचे प्रकरण तहसिल कार्यालय येथे मिळुन येत नसल्याची माहिती मिळाल्याने तक्रारदार यांनी भुमि अभिलेख कार्यालयातुन पुन्हा सर्व नोंदी काढुन ते सर्व कागदपत्रे तहसिल कार्यालय, सिन्नर येथे जमा केले होते. त्यावरुन तलाठी, ठाणगांव यांना सदर अहवालावरुन ७/१२ उताऱ्यावर नोंदी घेणे बाबत आदेश दिले होते. त्यानंतर तक्रारदार यांनी सदर कामाबाबत आलोसे क्र. १ यांची भेट घेतली असता आलोसे क्र. १ यांनी आलोसे क्र.२ यांनी सांगितल्याशिवाय ७/१२ उताऱ्यावर नोंद घेणार नाही असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी आलोस क्र.२ यांची भेट घेतली असता आलोसे क्र.२ यांनी तक्रारदार यांचेकडे १,००,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची दि.०६.१०.२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता आलोसे क्र. १ व २ यांनी समोर आलोसे क्र. ३ यांनी तक्रारदार यांना आलोसे क्र. १ व २ यांना लाचेची रक्कम देण्यासाठी प्रोत्साहन देवून तक्रारदार यांचेकडे एका उताऱ्यांचे २५,०००/- रुपये प्रमाणे चार उताऱ्यांचे एकुण १,००,०००/- रुपये अशी आलोसे क्र. १ व २ यांचेकरीता लाचेची मागणी केली त्यास आलोसे क्र. १ व २ यांनी दुजोरा देवून लाच स्विकारण्याचे मान्य केले.

आज दि. ०४.११.२०२५ रोजी सापळा कारवाईचे आयोजन केले असता आलोसे क्र. --- यांचे सांगणे वरुन आरोपी क्र.४ यांनी आलोसे क्र. १ व २ यांचे समक्ष सिन्नर तहसिल कार्यालयाचे समोरील रस्त्यालगत येथे तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष १,००,०००/- रुपये लाच स्विकारल्यानंतर त्यांना रंगहाथ पकडण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| **सापळा अधिकारी** | पोलीस निरीक्षक श्रीमती रुपाली खांडवी, नाशिक |
| **सापळा पथक** | पो.हवा./पंकज पळशिकर,पो.हवा./प्रभाकर गवळी,पो.हवा./प्रमोद चव्हाणके,पो.हवा/संदिप हांडगे,पो.अं./किरण धुळे |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी/ कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे संपर्क साधावा.**

**"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक आपले सेवेशी सदैव तत्पर"**

**संपर्क पत्ता** :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— **spacbnasik@mahapolice.gov.in**
**टोलफ्री कमांक** :- १०६४, **दुरध्वनी कमांक** :- ०२५३-२५७५६२८